# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **नागपूर, दि. १७ ऑगस्ट २०१९**

# पूनम मॉलचे शिकस्त बांधकाम तोडा!

## मनपाने बजावली नोटीस : २४ तासात पाडण्यासाठी बजावले

**नागपूर, ता. १७ :** वर्धमान नगर, जुना बगडगंज रोड स्थित पूनम मॉल इमारतीमधील थिएटरचे सुमारे ७१४२.२० चौ.मी. क्षेत्रफळाचे शिकस्त बांधकाम २४ तासाच्या आत पाडण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या स्थावर विभागाने शनिवारी (ता. १७) नोटीस बजावली आहे. इमारतीची लीज असलेले मे. इंडो पॅसिफिक सॉफ्टवेअर ॲण्ड एंटरटेनमेंट लि. यांना ही नोटीस बजावण्यात आली आहे.
सदर नोटीसमध्ये नमूद केल्यानुसार, सदर कंपनी घर क्र., भूखंड क्र. १९७ मिडल रिंग रोड प्रिसिंक्ट मौजा हिवरी, वर्धमान नगर, जुना बगडगंज रोड या जागेची लीजधारक आहे. कंपनीने तेथे पूनम मॉल उभारला. याच मॉलच्या इमारतीत थिएटरचे आहे. १६ ऑगस्ट रोजी उत्तर व दक्षिण दिशेकडील बांधकाम रात्री पडले. या घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला व दोघे जखमी झाले. नागपूर महानगरपालिकेच्या चमूने १७ ऑगस्ट रोजी सकाळी इमारतीचे निरीक्षण केले

असता इमारतीच्या पूर्व भागाकडील थिएटरच्या बांधकामाचे उत्तर व दक्षिण दिशेकडील बांधकाम शिकस्त झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर इमारतीच्या तिसऱ्या व चौथ्या माळ्याचे ३५७१.१० चौ. मी . क्षेत्रफळाचे पक्के बांधकाम पडल्यामुळे इमारतीच्या पूर्वेकडील भागातील पहिला मजला तसेच दुसरा, तिसरा व चौथ्या मजल्याचे ७१४२ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम मनपाने शिकस्त घोषित केले. यामुळे धोका निर्माण झाला असून २४ तासाच्या आत सदर बांधकाम पाडण्याचे आदेश नोटीसच्या माध्यमातून देण्यात आले आहे. बांधकाम न पाडल्यास पुढली कार्यवाही १८ ऑगस्ट रोजी मनपातर्फे करण्यात येईल, असेही नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे.